झोन नंबर १८.२

शासकिय मुल्यांकन रुपये /- नोंदणी फि रु. /-

प्रत्यक्षात किंमत र. रुपये /- स्टॅम्प रु. /-

ॐ साई

# :: फ्लॅट विक्री करारनामा ::

फ्लॅट विक्री करारनामा आज दिनांक माहे इसवी सन २०१७ ते दिवशी नाशिकरोड मुक्कामी :-

| | |
|---|---|
| १. श्री.<br>उ. व. , धंदा- , PAN-<br>२. सौ.<br>उ. व. , धंदा- , PAN-<br>राह. | लिहुन घेणार |

..यांसी..

| | |
|---|---|
| साई आर्केड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,<br>रघुकुल नगर, पंचक, जेलरोड, नाशिकरोड.<br>रजि.नं. एनएसके/एनएसके/एचएसजी/(टीसी)<br>५३३६/२०११ दिनांक ३०/१२/२०११<br>तर्फे चेअरमन - **श्री. किरण शांतीलाल पटेल**<br>उ. व. ३०, धंदा- व्यापार,<br>राह. जमुना कुंज, अमृत नगर, जेलरोड, नाशिकरोड. | लिहुन देणार |

कारणे फ्लॅट विक्री करारनामा लिहुन देतात ते ऐसा जे की:-

१) **मिळकतीचे वर्णन :-**

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, रघुकुल नगर, पंचक, जेलरोड, नाशिकरोड येथील मौजे पंचक ह्या गावचे शिवारातील **सर्व्हे नंबर ६५/९+१०+११+१२ पैकी** मंजुर ले-आऊट मधील बिनशेती **प्लॉट नं. ९+१०+११** यांसी एकूण क्षेत्र **५४४.४१ चौरस मीटर** + सदर मिळकतीवर डी झोनचा घेतलेला टी.डी.आर. **यांसी क्षेत्र २१७.०० चौ.मीटर,** सह, यांसी प्लॉटची एकत्रित चतु:सिमा खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **पुर्वेस** | : | बाजुची मिळकत |
| **पश्चिमेस** | : | प्लॉट नं. ८ |
| **दक्षिणेस** | : | स.नं. ६५ पैकी उर्वरित क्षेत्र |
| **उत्तरेस** | : | ७.५ मीटर कॉलनी रोड |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णनाच्या मिळकती. जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेपासह, जाणे-येणेचे, वागवहिवाटीचे हक्क, तसेच मंजुर ले-आऊट मधील कॉलनी रोड वापरण्याचे हक्क व अधिकारासह तदंगभूत वस्तुसह दरोबस्त.

२) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकती ह्या बिनशेती असून मा.जिल्हाधिकारी साो. नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र. मह/कक्ष-३/बि.शे.प.क्र.४/७३/२००२ दिनांक १३/६/२००२ अन्वये बिनशेती म्हणून जाहिर केलेली आहे.

३) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीचा फायनल ले-आऊट मे.सहाय्यक संचालक साो. नगररचना, नाशिक महानगरपालिका नाशिक, यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जावक नंबर/नगररचना विभाग/अंतिम/१८/२८७ दिनांक १६/०६/२००१ अन्वये मंजूर केलेला आहे.

४) सदर मिळकतीचा प्रोजेक्ट हा लिहून देणार यांनी Real Estate (Regulation And Redevelopment) Act,2016 चे तरतुदीनुसार Real Estate Regulatory Authority यांचेकडे अर्ज क्रमांक_______________ दिनांक ____________अन्वये नोंदविलेला आहे.

५) वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकती ह्या साई आर्केड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., या संस्थेच्या मालकीची असून वरील संस्थेचे लाभात मा. दुय्यम निबंधक साो. नाशिक-२ यांचे कार्यालयात नोंदणी दस्त क्र.५०६,५०७ व ५०८/२०१२ अन्वये दिनांक ११/१/२०१२ रोजी खरेदीखत नोंदविण्यात आलेले आहे व संस्थेचे नाव रेकॉर्ड ऑफ राईटला लावण्यात आलेले असून, सदरील मिळकत ही संस्थेच्या कब्जात, उपभोगात व वहिवाटीत आहे. तसेच संस्थेने डी झोनचा टी.डी.आर. खरेदी केलेला असून सदरचा दस्त मा.दुय्यम निबंधक साो. नाशिक-५ यांचे कार्यालयात दस्त क्र. ८६५/२०१४ अन्वये दिनांक २३/०१/२०१४ रोजी नोंदणी केलेला आहे. सदरील संस्था ही महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० अन्वये नोंदणीकृत असून तिचा रजि.नं. एनएसके/एनएसके/एचएसजी/(टीसी)/५३३६/२०११ दिनांक ३०/१२/२०११ असा आहे.

६) **साई आर्केड** को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., ह्या संस्थेने वर कलम १ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर एकूण १६ फ्लॅटसचे बांधकाम करण्याचे ठरविले असून

सदर इमारतीचा बिल्डींग प्लॅन नाशिक महानगरपालिकेने त्यांचे पत्र क्र. एलएनडी/बीपी/सी-४/२२८/५४२६ दिनांक ०३/०३/२०१४ अन्वये मंजुर केलेला आहे. तसेच त्यानंतर नाशिक महानगरपालिकेने त्यांचे पत्र क्र. नगररचना विभाग/वशि/४४६ दिनांक १४/८/२०१५ रोजी बांधकाम परवानगी साठी मुदतवाढ दिलेली आहे.

७) लिहून घेणार यांचे मागणीनुसार लिहून देणार यांनी सदर प्रोजेक्टचे टायटलचे अनुषंगाने आवश्यक असलेले कागदपत्र म्हणजेच जमिनीचे कागदपत्र, आर्किटेक्टमार्फत तयार केलेले प्लॅन व Real Estate (Regulation And Redevelopment) Act, 2016 प्रमाणे व सदर कायद्यात नमुद नियम व नियमावली प्रमाणे सर्व कागदपत्र लिहून घेणार यांना पडताळणीकामी दिलेले आहे.

८) सदर फ्लॅट विक्री करारनाम्यात लिहून घेणार यांचा उल्लेख **तुम्ही**, लिहून देणार यांचा उल्लेख **चेअरमन/आम्ही** असा केलेला आहे व या करारनाम्यात तुम्हांस विक्री करण्यात आलेल्या फ्लॅट मिळकतीचा उल्लेख **सदर मिळकत** असा करण्यात आलेला आहे.

९) वर नमुद केलेल्या कथनाप्रमाणे सदरील संस्थेच्या इमारतीमधील मजल्यावर असलेला **फ्लॅट क्रमांक ( )** यांसी अंदाजित **क्षेत्र ०००.०० चौ.फुट** बिल्टअप **म्हणजेच ००.०० चौ.मीटर,** बेड + हॉल + किचन+ बाल्कणी + संडास, बाथरुमसह, हा फ्लॅट पसंत केलेला असून सदर फ्लॅट तुम्ही विकत घेण्याचे ठरविले असून त्यानुसार तुम्ही आमच्याकडे येऊन सदर फ्लॅट विकत घेणेकामी आमच्या बरोबर चर्चा व बोलणी करुन सौदा पक्का केला व तसेच आम्ही सुध्दा सदरील फ्लॅट तुम्हांस विक्री करण्याचे मान्य व कबुल केले. त्यानुसार प्रस्तुतचा फ्लॅट विक्री करारनामा आम्ही तुम्हांस लिहून देत आहे. तुम्हांस विक्री केलेल्या **फ्लॅट**ची चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस :

पश्चिमेस :

दक्षिणेस :

उत्तरेस :

येणेप्रमाणे चतु:सिमेतील फ्लॅट मिळकत. त्यात सामाईक जिन्याने, लिफ्टने जाणे येण्याचे, वागवहिवाटीचे, वापरण्याचे हक्क व अधिकारासह, तदंगभुत वस्तुसह दरोबस्त.

१०) तुम्हांस विक्री करण्यात आलेल्या फ्लॅट मिळकतीची किंमत तुमचे व आमचे दरम्यान चर्चा व बैठका होऊन खालीलप्रमाणे ठरलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| फ्लॅटची होणारी एकूण किंमत | रुपये | ००,००,०००/- |
| सभासद शेअर्स व प्रवेश फी | रुपये | ६००/- |
| | एकूण रक्कम रुपये | ००,००,०००/- |

वर प्रमाणे रक्कम **रुपये ००,००,०००/- (अक्षरी रक्कम फक्त)** इतकी मिळकतीची किंमत ठरलेली असून तुम्ही वरीलप्रमाणे ठरलेली रक्कम संस्था चेअरमन यांना सदरील मिळकती पोटी खालीलप्रमाणे द्यावयाची असून ती उभयतांना मान्य व कबुल आहे.

| | | |
|---|---|---|
| बुकींग करतेवेळेस दिलेले आहे. | रुपये | ००,०००/- |
| आजपासून १५ दिवसाच्या आत द्यावयाचे आहे. | रुपये | ००,००,०००/- |
| | एकूण रक्कम रुपये | ००,००,०००/- |

११) वर नमुद केल्याप्रमाणे लिहून घेणार यांनी वेळचेवेळी ठरलेल्या किंमतीचा भरणा करणे ही या करारनाम्याची महत्वाची शर्त आहे. ठरलेल्या मुदतीत रकमेचा भरणा तुमचेकडून न मिळाल्यास सदरचा करारनामा हा रद्द करण्यात येईल अथवा वरील रक्कम देण्यास तुम्ही असमर्थ ठरल्यास त्यावर द.सा.द.शे. २४% प्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल, त्यास तुमची कुठल्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

१२) सदरील फ्लॅट मिळकत ही कुठल्याही सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी वित्त संस्थेकडे गहाण ठेवलेली नसुन सदरहू मिळकत ही तुमचेशिवाय इतर कोणासही विक्री केलेली नसुन किंवा विक्री करावयाचे ठरविलेले नसुन सदरहु मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची अशी असून यदाकदाचित तसे काही आढळुन आल्यास त्याचे संपूर्ण निवारण हे आम्ही आमच्या पदरखर्चाने करुन देऊ, त्याची तोषीस तुम्हांस लागु देणार नाही.

१३) संस्था सभासदांसाठी कुठल्याही सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी वित्त संस्थेकडून कर्जाची उचल करणार नाही. त्यामुळे तुम्हांस कर्ज घ्यावयाचे असेल तर ते तुम्ही तुमच्या परीने घ्यावे व त्यात येणारा सर्व खर्च स्वत: सोसावयाचा आहे. तसेच कर्ज मिळालेनंतर बोजा निर्माण केल्यावर त्याची परतफेड तुमचे पध्दतीने करावी. त्यात तुम्ही संस्था किंवा चेअरमन यांना जबाबदार धरणार नाही किंवा त्यांचा काहीएक संबंध राहणार नाही.

१४) तुम्हांस विक्री केलेल्या फ्लॅट मिळकतीचा ताबा तुमचेकडून संस्थेने ठरवून दिलेल्या हप्त्यात रक्कम पूर्णपणे मिळालेनंतर देण्यात येईल, अशी तुम्हांस कल्पना दिली असून ते तुम्हांस मान्य व कबुल आहे. परंतु काही नैसर्गिक आपत्ती घडल्यास किंवा सरकारी अडचण आल्यास कब्जा लांबणे क्रमप्राप्त ठरेल अशी तुम्हांस कल्पना दिलेली असून ते तुम्हांस मान्य व कबुल आहे. तसेच कब्जा घेण्यास जर तुमचेकडून विलंब झाला तर संस्थेने तो पर्यंत सुरु केलेले किंवा आकारलेले व्यवस्थापन चार्जेस किंवा इतर वर्गणी तुम्हांस भरावी लागेल यांची जाणीव तुम्हांस आहे व त्यात थकबाकी झाल्यास संस्था द.सा.द.शे. २४ टक्के प्रमाणे व्याज आकारणी करेल, हे तुम्हांस मान्य व कबुल आहे. तसेच सदरील मिळकतीचे करारनामा/कायमचे फरोक्त खरेदीखत नोंदणी करावयाचे असल्यास त्याकामी येणारा संपूर्ण खर्च म्हणजेच स्टॅम्प डयुटी, लिहीणावळ, नोंदणावळ व इतर तत्सम स्वरुपाचा खर्च हा तुम्ही म्हणजेच लिहून घेणार यांनी करावयाचा व सोसावयाचा आहे.

१५) तुम्हास विक्री केलेल्या फ्लॅट मिळकतीचा ताबा घेतल्यानंतर तुम्ही सवखर्चाने त्याचा मेंटेनन्स करावयाचा आहे. तसेच लागणारे सरकारी कर, म्य.पल कॉर्पोरेशन टॅक्स, संस्थेची सामाईक वर्गणी व इतर खर्च हे तुम्हांस परस्पर भरावे लागणार आहे. त्याचा संस्था चेअरमन यांचेशी काहीएक संबंध राहणार नाही.

१६) प्रमोटर/बिल्डर हे बांधत असलेल्या इमारतीकरिता शासनाने काही वेगळा टॅक्स लागु केल्यास (जसे की-सेवा कर, म.न.पा. सेस कर,व्हॅट, एलबीटी इ.) व ते तुमच्या हिश्यात जो काही प्रमाणात येईल, तो तुम्हांस वेगळा भरावा लागेल, याची जाणीव तुम्हांस व्यवहार ठरवितांना दिलेली असून ते तुम्हांस मान्य व कबुल आहे.

१७) संस्थेचे नियम, अटी व शर्ती तुम्ही मान्य केलेले असून संस्थेच्या कामकाजात तुमचे कडून लागणारे पेपर्स तुम्ही पुरविणार आहात, तसेच पाहिजे त्या ठिकाणी सह्या करुन संस्थेच्य कामात सहकार्य करण्याचे तुम्ही मान्य व कबुल केलेले आहे.

१८) संस्थेच्या पूर्व परवानगी शिवाय तुम्हांस विक्री केलेली फ्लॅट मिळकत भाडयाने, पोटभाडयाने, गहाण किंवा दुसऱ्यास विकता किंवा हस्तांतरीत करता येणार नाही किंवा तुम्ही कुठल्याही प्रकारचे दुसरे अतिरिक्त चार्जेस निर्माण करु शकणार नाही, ह्याची जाणीव तुम्हांस संस्था चेअरमन यांनी दिलेली असून ते तुम्हांस मान्य व कबुल आहे.

१९) तुम्हांस सदरील फ्लॅट मिळकत निवासी वापराकरीता विक्री केलेली असुन तुम्हांस सदरहू मिळकतीत कुठल्याही प्रकारचा व्यवसाय करावयाचा नाही. तसेच संस्थेच्या पुर्व परवानगीशिवाय वाढीव बांधकाम किंवा बिल्डींगचे एलिव्हेशन खराब होईल असे रंगरंगोटी करता येाार नाही. याची जाणीव तुम्हांस संस्था चेअरमन यांनी दिलेली असून ते तुम्हांस मान्य व कबुल केलेले आहे.

२०) संस्थेने बांधत असलेल्या इमारतीसंबंधी सर्व पेपर्स, मंजुर झालेला प्लॅन तसेच इतर कायदेशीर पेपर्स तुम्ही पाहिलेले असून त्यापरत्वे समाधान व्यक्त केले असून सदर मिळकत ही टायटल क्लिअर व मार्केटेबल आहे, यांची जाणीव तुम्हांस झालेली आहे.

२१) सदर फ्लॅट मिळकतीचा ताबा घेतल्यानंतर संस्थेची सामाईक जागा जसे की, जिना, लिफ्ट, गच्ची, पार्कींग, वॉल कंम्पांऊड व मोकळी जागा इत्यादीवर तुम्हांस तुमचा मालकी हक्क व अधिकार सांगता येणार नाही. मात्र सामाईकपणे वापर करण्याचा हक्क व अधिकार तुम्हांस राहील.

२२) तुम्हांस विक्री करण्यात आलेल्या फ्लॅट मिळकतीचे क्षेत्र हे बिल्टअप क्षेत्र आहे. सदरील क्षेत्र हे कार्पेट क्षेत्रावर ३० % वाढीव याप्रमाणे बिल्टअप क्षेत्र असे ठरलेले असून होणाऱ्या बिल्टअप क्षेत्राप्रमाणेच एकूण किंमत ठरविलेली आहे. सदरील मोजमाप हे विट बांधकाम ते विट बांधकाम अशा पध्दतीने होणाऱ्या कार्पेट क्षेत्रावर बिल्टअप क्षेत्र मोजण्यात आलेले आहे, याची जाणीव तुम्हांस व्यवहार ठरवितांना देण्यात आलेली असून ते तुम्ही मान्य व कबुल केलेले आहे.

२३) नाशिक शहराचे सध्याचे हवामानामुळे उच्च प्रतिचे बांधकाम केलेले असतांना सुध्दा हवामानात होणाऱ्या बदलामुळे स्ट्रक्चरला तडे जात आहे. त्यामुळे भविष्यात स्ट्रक्चरला/ फ्लॅट मिळकतीला अशा प्रकारचे तडे गेल्यास त्याबाबत आम्हांस जबाबदार धरले जाणार नाही. याची जाणीव/कल्पना तुम्हांस व्यवहार ठरवितांना देण्यात आलेली असून ते तुम्ही मान्य व कबुल केलेले आहे.

२४) सदरील मिळकतीमध्ये ज्या सुखसुविधा देण्यात येणार आहे. त्याचे सविस्तर वर्णन **परिशिष्ठ अ** मध्ये केलेले असून त्या व्यतिरिक्त तुम्हांस जादा सुविधा पाहिजे असल्यास त्याचे वेगळे चार्जेस द्यावे लागतील. याची जाणीव तुम्हांस असून ते तुम्ही मान्य व कबुल केलेले आहे.

२५) संस्थेचे नियम, मंजुर उपविधी तसेच सदर फ्लॅट विक्री करारनाम्यात दर्शविलेल्या अटी व शर्ती तुम्ही वाचल्या असून त्या तुम्हांस मान्य व कबुल आहे. यदाकदाचित संस्थेच्या कुठल्याही प्रकारचे नियम किंवा सदर फ्लॅट विक्री करारनाम्यात दर्शविलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास कुठल्याही प्रकारची नोटीस न देता तुमचे सभासदत्व रद्द करण्यात येईल, याची जाणीव तुम्हांस दिलेली आहे.

२६) सदरील संस्थेच्या इमारतीत सभासदांच्या सोईसाठी लिफ्ट  बसविण्यात आलेली आहे. त्याचा सामाईकपणे वापर तुम्हांस करता येईल. मात्र त्यावर तुम्हांस मालकी हक्क प्रस्थापित करता येणार नाही. तसेच सदर इमारतीच्या देखभाल दुरुस्तीकरीता संस्था मेंटेनन्स गोळा करणार आहे. त्याची प्रत्येक फ्लॅटधारकांसाठी होणारी रक्कम रुपये ७५,०००/- ही तुम्हांस ठरलेल्या किंमती व्यतिरिक्त वेगळी फ्लॅट मिळकतीचा ताबा घेण्याच्या अगोदर द्यावी लागेल, याची जाणीव तुम्हांस व्यवहार ठरवितांना दिलेली असून ते तुम्हांस मान्य व कबुल आहे.

२७) सदरील मिळकतीचे ठरलेल्या किंमती व्यतिरिक्त सदरील मिळकतीमध्ये प्राप्त होणाऱ्या इलेक्ट्रीक मिटर चार्जेस, डी.पी. चार्जेस, पाणी कनेक्शन चार्जेस व अपार्टमेंट मेन्टेनन्स डिपॉझिट इ. साठीचा येणारा खर्च हा तुम्ही आम्हांस वेगळा ठरलेल्या किंमती व्यतिरिक्त द्यावयाचा असून ते तुम्हांस मान्य व कबुल आहे.

२८) सदर करारनामाविषयी लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये काही वाद उद्‌भवल्यास सदरचा वाद उभयपक्षांनी आपसात लवादची नेमणुक करुन मिटवायचा आहे. लवादाने दिलेला निर्णय उभयंतांवर बंधनकारक राहील. तसेच लवादाने दिलेला निर्णय मान्य नसल्यास सदरचा वाद Real Estate (Regulation And Redevelopment) Act, 2016 नुसार संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार करावयाची आहे.

२९) सदरचा करारनामा हा Real Estate (Regulation And Redeveopment) Act, 2016 च्या तरतुदीस व महाराष्ट्र ओनरशिप ॲक्ट (रेग्युलेशन ॲन्ड प्रमोशन ऑफ कंन्स्ट्रक्शन, सेल, मॅनेजमेंट ॲण्ड ट्रान्सफर) कायदा १९७३ च्या तरतुदीस अधिन राहून केला आहे.

३०) सदरील मिळकतीचा व्यवहार उभयतांमध्ये उक्ती रक्कम **रुपये ००,००,०००/-** मध्ये ठरलेला असून तो उभयतांना मान्य व कबुल आहे. परंतु शासनाचे नियमाप्रामणे सदरील मिळकतीचे मुल्यांकन **रुपये ००,००,०००/-** इतके होत असून त्यावर एलबीटीसह रक्कम **रुपये ०,००,०००/-**चा स्टॅम्प लावुन नियमाप्रमाणे योग्य ती नोंदणी फी भरुन कायदेशीर पुर्तता केलेली आहे.

३१) सदरचा फ्लॅट विक्री करारनामा करतेवेळी एकूण ठरलेल्या किंमतीपोटी आजपावेतो तुमचेकडून आम्हांला खालीलप्रमाणे भरणा पावला, त्याचा तपशील येणेप्रमाणे.

| **रक्कम रुपये** | **तपशिल** |
|---|---|
| ००,०००/- | एनईएफटी द्वारे मिळाले, ते पावले तक्रार नाही. |
| **००,०००/-** | **(अक्षरी रक्कम रुपये मात्र)** |

वर प्रमाणे रक्कम **रुपये ००,०००/-** चा भरणा आजतागायत तुमचेकडून मिळाला असून भरणा पावला, भरण्याबाबत तक्रार नाही. उर्वरित रक्कम ही तुम्ही वर **कलम क्रमांक ८** मध्ये ठरल्याप्रमाणे मुदतीत द्यावयाची आहे ही ह्या करारनाम्याची महत्तवाची अट व शर्त आहे.

## परिशिष्ठ अ

## सुख-सुविधा (ॲमिनिटीज)

१. आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर आहे.
२. बाहेरील बांधकाम ६ इंची व आतील बांधकाम ४ इंची विटांचे आहे.
३. आतून नेरु प्लास्टर व बाहेरुन सिंगल कोट सॅन्डफेस प्लास्टर.
४. आतील बाजुस ऑईलबॉण्ड डिस्टेंपर कलर व बाहेरील बाजूस ॲक्रेलीक वॉटरप्रुफ कलर राहील.
५. प्रत्येक रुममधील खिडक्या ह्या थ्री ट्रॅक पावडर कोटेड ॲल्युमिनियम, मच्छर जाळी, काचेसह व सेफ्टी ग्रीलसह असेल.
६. हॉलचा दरवाज्याची फ्रेम प्लायवुड फ्रेम मध्ये आणि इतर सिमेंट फ्रेम मध्ये राहील.
७. हॉलचा दरवाजा लॅमिनेट फिटींगमध्ये व इतर संपुर्ण दरवाजे फ्लश डोअर, तसेच एम.एस.फिटींगसह राहील.
८. संडास बाथरुमचे दरवाजे ॲल्युमिनियम बॅकेलाईट शिट, सी.पी. फिटींगसह असेल.
९. संपूर्ण लाईट फिटींग कन्सील्ड, मॉडयुलर स्विचमध्ये राहील, प्रत्येक रुम मध्ये ३.५ पॉईट, किचन २.५ पॉईट व किचन आणि बाथरुम मध्ये प्रत्येकी एक पॉवर पॉईट असले व बाल्कनी, संडास, बाथरुम आणि पॅसेज मध्ये प्रत्येकी एक पॉईट.
१०. संपूर्ण फ्लोअरला २ X २ फुट विट्रीफाईड टाईल्स राहील.
११. किचन ओटा ग्रेनाईट मध्ये राहील.

१२. किचन ओटयावरती ७ फुटापर्यंत ग्लेझ टाईल्स, संडास व बाथरुममध्ये विंडोटॉपपर्यंत ग्लेझ टाईल्स बसविण्यात येईल.

१३. बाथरुममध्ये कन्सील्ड प्लंबिंग फिटींग सी.पी. मिक्सर कॉक शॉवर सह. व किचन मध्ये एक नळ व संडासमध्ये फ्लॅश टँक व पॅसेज मध्ये वॉश बेसींग बसविण्यात येईल.

१४. स्टेअरकेस ग्रीन मार्बल व टाईल्स मध्ये असेल.

१५. लिफ्ट ची सुविधा राहील.

## सामाईक सुविधा

१. जिना, लिफ्ट, गच्ची, पार्किंग व मोकळया जागा सामाईक वापरण्यासाठी राहील.

२. कॉमन पार्किंग व मोकळया जागेत फरशी किंवा पेव्हर ब्लॉक बसविण्या येईल.

३. इमारतीस तळांस स्वतंत्र इलेक्ट्रीक मिटर बसविण्यात येईल.

४. नाशिक महानगरपालिका यांचेकडील ३/४ इंची सामाईक पाण्याची लाईन व एक नळ राहील.

५. अंडरग्राऊंड व ओव्हरहेडवर एक पाण्याची टाकी राहील.

६. सामाईक सेप्टीक टँक सुविधा असेल.

७. कॉमन बोअरवेलची सुविधा असेल.

## मोजमाप पध्दती

१. सर्व रुम्स, बाथरुम, टॉयलेट व पॅसेजसह असलेले मोजमाप म्हणजे विटांच्या आतील बाजुपासून दुसऱ्या विटांच्या आतील बाजूपर्यंत मोजले जाईल.

२. रुममध्ये आलेल्या कॉलम कार्पेट एरियामधून वजा केला जाणार नाही.

३. डोअर जाम्सची जागा कार्पेट एरिया मध्ये मोजली जाईल.

४. टेरेसची मोजमाप पध्दत ही एकूण क्षेत्राच्या ५० टक्के मोजण्यात येईल.

५. कारपेट क्षेत्र + ३० टक्के (वाढीव) क्षेत्र याप्रमाणे बिल्टअप पध्दतीने केले जाईल.

येणेप्रमाणे सदरचा फ्लॅट विक्री करारनामा आज रोजी राजीखुशीने, स्वसंतोषाने, कोणाचेही धाक, दडपणास बळी न पडता, समजुन, उमजुन, लिहून व वाचून, पाहून साक्षीदारांचे समक्ष सह्या करुन दिलेला आहे.

हा फ्लॅट विक्री करारानाम्याचा दस्त.

१. श्री. ____________________

२. सौ. ____________________

(लिहून घेणार)

साई आर्केड को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,

तर्फे चेअरमन - **श्री. किरण शांतीलाल पटेल** ____________________

(लिहून देणार)

साक्षीदार :१.____________________ २.____________________